# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.04.2025** **वारःशुक्रवार**

---

•पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्यावर त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी कारवाई केली जाईल – पंतप्रधानांचा इशारा

•पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दहशतवादाविरोधातील सरकारच्या कृतीला सर्व पक्षांचा पूर्ण पाठिंबा

•काश्मीरमध्ये गेलेले राज्यातले 500 पर्यटक सुखरूप परतले;

•आणि

•राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त गोंदिया जिल्ह्यातल्या डव्वा ग्रामपंचायतीला पंतप्रधानांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**<u>पंतप्रधानआश्वासन</u>**

पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना आणि त्यांना मदत करणाऱ्यांना, त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा केली जाईल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. ते काल मधुबनी इथं राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त आयोजित जाहीर सभेत बोलत होते. माणुसकीवर विश्वास ठेवणारा प्रत्येक जण भारतासोबत आहे, असंही पंतप्रधान म्हणाले,

**<u>S /B पंतप्रधान</u>**

स्क्रिप्ट

यह हमला केवल पर्यटकों पर नहीं हुआ है, देश के दुश्मनों ने भारत की आत्मा पर प्रहार करने का दुस्साहस किया है। मैं, मोहित, स्पष्ट शब्दों में कहना चाहता हूँ कि जिन्होंने यह हमला किया है, उन आतंकियों को और इस साजिश

को रचने वालों को उनकी कल्पना से भी बड़ी सज़ा मिलेगी — और यह सज़ा ज़रूर मिलेगी। अब वक्त आ गया है कि आतंकियों की बची-खुची ज़मीन को भी मिट्टी में मिला दिया जाए।"

भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी पंतप्रधानांनी एक क्षण मौन पाळून प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहिली.

**सर्वपक्षीय बैठक**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्र्वभूमीवर पाकिस्तानच्या विरोधात  मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीनं केलेल्या कारवाईला सर्व पक्षांनी पाठिंबा दर्शवला आहे.  दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात सर्व संभाव्य कृतींनाही आपला पूर्ण पाठिंबा असेल, असं आश्वासनही सर्व विरोधी पक्षांनी सरकारला दिलं आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारनं काल नवी दिल्ली इथं संसद भवन संकुलात बोलविलेल्या सर्वपक्षीय बैठकीमध्ये त्यांनी हे आश्वासन दिलं. या बैठकीत संरक्षण मंत्र्यांनी पहलगाम इथं घडलेल्या घटनेची आणि त्या विरोधात सीसीएसच्या बैठकीत भारत सरकारनं केलेल्या कृतींची माहिती दिली. सर्व पक्षांनी या दहशतवादी हल्ल्याबद्दल चिंता व्यक्त करून त्याविरोधातल्या सर्व कृतींना पाठिंबा पूर्ण पाठिंबा व्यक्त केला, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिली.

**बाईट – रिजिजू**

या घटनेच्या विरोधात आणखी कठोर कारवाई करण्याची इच्छाही सरकारच्या वतीनं बैठकीत व्यक्त करण्यात आली. या बैठकीत सर्व पक्षांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला; सरकारकडून जी कोणती कारवाई करण्यात येईल, त्याला आपला पाठिंबा असेल असं लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं. जम्मू काश्मीरमध्ये शांतता राखण्यासाठी  प्रयत्न करण्याची गरज  काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी व्यक्त केली.

**बाईट – खरगे**

**राष्ट्रपती**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात जाऊन भेट घेतली. जयशंकर यांनी निवडक देशांच्या राजदूतांशी देखील काल या संदर्भात चर्चा केली. जर्मनी, जपान, पोलंड, युके आणि रशिया या देशांचे राजदूत यावेळी उपस्थित होते.

**पर्यटक**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर गेल्या 2 दिवसात राज्यातले सुमारे 500 पर्यटक राज्यात परतले आहेत. राज्य सरकारने या पर्यटकांसाठी दोन विशेष विमानांची व्यवस्था केली होती, त्यातून 184 पर्यटक काल मुंबईत दाखल झाले आहेत. आणखी 232 प्रवाशांसाठी आज एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकारनं केली आहे. काश्मिरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातील कक्ष अशी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विनंतीवर काम केलं जात आहे.

**पंतप्रधानपोलाद**

भारताचा पोलाद उद्योग नव्या आत्मविश्वासानं भविष्याकडे बघत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबईत बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या इंडिया स्टील २०२५च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन कल पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रीय पोलाद धोरणांतर्गत निर्धारित केलेल्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांवर त्यांनी यावेळी प्रकाश टाकला. येत्या २०३० पर्यंत देशातलं पोलाद उत्पादन ३० कोटी टनांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्यांचही ते यावेळी म्हणाले.

**पंतप्रधानबिहार**

देशाचा विकास गावखेड्यांच्या विकासातून साकार होतो, या महात्मा गांधींच्या संकल्पनेवर पंचायती राज योजना राबवण्यात येत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी काल बिहारमध्ये केलं. मधुबनी इथे पंचायती राज

दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायतींना राष्ट्रीय पंचायत पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या पुरस्कारांमध्ये राज्यातील गोंदिया जिल्ह्याच्या डव्वा ग्रामपंचायतीला 2023-24 या वर्षासाठी हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कारानं पंतप्रधानांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं. ग्रामपंचायतच्या सरपंच योगेश्वरी चौधरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.  पुरस्काराचे स्वरुप 1 कोटी रुपये रोख पारितोषिक, मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे आहे.

मोदी यांच्या हस्ते १३ हजार ५०० कोटी रुपये खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांचं पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण करण्यात आलं. यात सहरसा ते मुंबई अमृत भारत एक्सप्रेसचा समावेश आहे.

**<u>वेव्हज्2025परिषद</u>**

जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातली वेव्हज् 2025 परिषद येत्या 1 ते 4 मे या कालावधीत मुंबईत, बीकेसी इथल्या जिओ वर्ल्ड सेंटर इथं होत आहे. या परिषदेचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या परिषदेत जगभरातून 100 पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. ओटीटी, ॲनिमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया या सर्वच क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचं आयोजन होत आहे.

**<u>हरितऊर्जा</u>**

देशात हरित ऊर्जा परिसंस्था विकसित करण्यास आणखी वेग येण्याच्या अनुषंगानं राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ आणि भारतीय हरित ऊर्जा महासंघ यांच्यात काल एक महत्त्वाचा सामंजस्य करार करण्यात आला. देशात ऊसावर आधारित जैवऊर्जा आणि शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं हा या करार करण्यात आला आहे. या करारावर सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक  प्रकाश नाईकनवरे आणि हरित ऊर्जा महासंघाचे अध्यक्ष अतुल मुळे यांनी स्वाक्षरी केली. इंडिया बायोएनर्जी अँड टेक एक्स्पोच्या पार्श्र्वभूमीवर  बुधवारी नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात हा करार करण्यात आला.

**पुरस्कार**

मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८३वा स्मृतिदिनानिमित्त लता मंगेशकर पुरस्कार प्रदान सोहळा काल मुंबईत दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात पार पडला. यावेळी ज्येष्ठ उद्योजक कुमार मंगलम बिर्ला यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते लता मंगेशकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रद्धा कपूर, सुनील शेट्टी, सचिन पिळगावकर, शरद पोंक्षे, सोनाली कुलकर्णी, रीवा राठोड, आरंभ ग्रुप यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. श्रीपाल सबनीस यांना वाग्विलासिनी पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये बेंगळुरू इथे झालेल्या कालच्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने राजस्थान रॉयल्स संघाचा ११ धावांनी पराभव केला. विराट कोहली आणि देवीदत्त पडिकल यांच्या दमदार खेळीमुळे रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने राजस्थान रॉयल्ससमोर निर्धारित २० षटकांत पाच गडी गमावून २०६ धावांचं लक्ष्य ठेवलं. कोहलीने ७० धावा केल्या तर पडिकलने ५० धावा केल्या.

राजस्थान रॉयल्स संघाला मात्र निर्धारित २० षटकांत ९ गडी गमावत केवळ १९४ धावा करता आल्या.

हवामान

विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली असून, राज्यात काल सर्वात जास्त कमाल तापमान ब्रह्मपुरी इथं 45 पूर्णांक 6 दशांश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, तसंच कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तापमानात किंचित वाढ झाली आहे. येत्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्र,विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार..